COURT BOOK

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

# महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१

( दिनांक १ सप्टेंबर १९८७ पर्यंत सुधारित

[ किंमत—रु. ३.५० ]

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

१९८८

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | नियम | नियमाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | १ | संक्षिप्त नाव व प्रारंभ | ३ |
| २ | २ | व्याख्या | ३–९ |
| ३ | ३ | शासकीय कर्मचाऱ्याने, मोफत वैद्यकीय परिचर्येसाठी खर्च केलेल्या एखाद्या रकमेची वैद्यकीय प्रतिपूर्ती. | ९ |
| ४ | ४ | सर्वात जवळच्या शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याने केलेली वैद्यकीय देखभाल आणि त्यांना अनुज्ञेय असलेला प्रवास भत्ता व फी आणि त्यासाठी शासकीय कर्मचाऱ्याचा प्रवास भत्ता. | १० |
| ५ | ५ | रुग्ण जेथे आजारी पडतो ती जागा म्हणजे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे मुख्यालय नसेल तेव्हा रुग्णाला आणि प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याला प्रवास भत्ता देणे. | १०–११ |
| ६ | ६ | रुग्णासह परिचर्या अधिकारी आणि त्याला अनुज्ञेय असलेला प्रवास भत्ता. | ११ |
| ७ | ७ | प्रवास भत्त्याचे दर | ११ |
| ८ | ८ | शासकीय आणि अशासकीय रुग्णालयांमध्ये आंतररुग्ण म्हणून मोफत उपचार घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याने खर्च केलेल्या कोणत्याही रकमेची वैद्यकीय प्रतिपूर्ति. | ११–१२ |
| ९ | ९ | रुग्णाच्या निवासस्थानी उपचार करणे. | १२ |
| १० | १० | औषधे पुरवणे आणि शासकीय दवाखान्यात आणि रुग्णालयात उपलब्ध नसलेल्या औषधांच्या रकमेची प्रतिपूर्ति करणे. | १२ |
| ११ | ११ | वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या मागण्या सादर करणे. | १३ |
| १२ | १२ | वैद्यकीय देखभालीच्या संबंधात केलेला परंतु त्यात समाविष्ट न केलेला सेवांवरील खर्च. | १३ |
| १३ | १३ | मोफत वैद्यकीय देखभालीसाठी उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश आणि ओरिसा यांच्या शासनांशी केलेली परस्पर व्यवस्था. | १३ |

| अनुक्रमांक | नियम | नियमाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १४ | १४ | कुटुंबातील व्यक्तींची संख्या | १३ |
| १५ | १५ | निर्बीजीकरण केल्यानंतर/निर्बीजीकरण केलेल्या व्यक्तीला विनामूल्य वैद्यकीय उपचार अनुज्ञेय असणे. | १४ |
| १६ | १५–अ | मोफत वैद्यकीय उपचारांसाठी कर्मचाऱ्यास अपात्र ठरवण्यात आल्यानंतर त्याने निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करुन घेतल्यास त्यास मोफत वैद्यकीय उपचारांसाठी पात्र ठरवणे. | १४ |
| १७ | १६ | निकडीच्या परिस्थितीमध्ये खाजगी रुग्णालयामध्ये केलेले आंतर-उपचार, परदेशात केलेले उपचार, विशेषज्ञांनी केलेले उपचार आणि त्याची प्रतिपूर्ती, साधनसामग्री आणि उप-यंत्रे यांवरील खर्चाची प्रतिपूर्ति. | १४–१५ |
| १८ | १७ | वैद्यकीय प्रतिपूर्तिच्या पूर्वीच्या पद्धतीचे सुलभीकरण. | १६ |
| १९ | १८ | हृदय शस्त्रक्रिया, मूत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया, रक्तांचा कर्करोग आणि उपमार्ग साधक हृदय शस्त्रक्रिया ( बायपास कॉरोनरी सर्जरी ) यांसाठी आगाऊ रक्कम देणे. | १६ |


## परिशिष्टे


| | | | |
|---|---|---|---|
| १] | एक | अर्जाचा नमुना | १७–१९ |
| २] | दोन | प्रमाणपत्र "अ" | २०–२१ |
| ३] | तीन | प्रमाणपत्र "ब" | २२–२३ |
| ४] | चार | नमुना "क" | २४ |
| ५] | पाच | नमुना "ड" | २५–२६ |
| ६] | सहा | अर्जाचा नमुना | २७ |


COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

## सार्वजनिक आरोग्य विभाग

सचिवालय, मुंबई दिनांक ९ मे १९६१ / वैशाख १९, १८८३

**क्रमांक** एमएजी १०५८–एस.–पुढील, "महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१" सर्वसाधारण माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

# महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१

( दि. १ सप्टेंबर १९८७ पर्यंत सुधारित )

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ :—**

(१) या नियमांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ असे म्हणता येईल.

(२) ते संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू होतील.

(३) ते १ जून १९६१ पासून अंमलात येतील.

त्या तारखेपासून, महाराष्ट्र राज्याच्या शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असणारे, भूतपूर्व मुंबई राज्य, मध्यप्रदेश राज्य व हैदराबाद राज्य यांचे, शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय देखभालीसंबंधीचे नियम व आदेश निरसित होतील.

२. **व्याख्या :—**

या नियमांमध्ये, विषयानुसार किंवा संदर्भानुसार एतद्विरुद्ध काहीही नसेल तर—

(१) "रुग्ण" म्हणजे, शासकीय कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती;

(२) "शासकीय कर्मचारी" म्हणजे, रोजंदारीवर नेमलेला कर्मचारीवर्ग वगळता, महाराष्ट्र शासनाने पूर्णवेळ तत्त्वावर नेमलेली कोणतीही व्यक्ती, मग ती कायम असो किंवा तात्पुरती असो– आणि त्यामध्ये—

(अ) रजेवर असलेला किंवा निलंबित केलेला (Under Suspension) शासकीय कर्मचारी ; आणि

(ब) कोणत्याही शासकीय रुग्णालयातील मानसेवी वैद्यकीय अधिकारी ;

शा. नि. सा. आ.वि.क्र.एच-एजी–१०६२/ ५८०७४/ पी, दिनांक ८-१-१९६९.

(क) एक वर्षापेक्षा कमी नसलेली सेवा झालेले व मासिक दराने वेतन घेणारे कार्य-व्ययी आस्थापनेवर (Work charged Establishment) नेमलेले कर्मचारी यांचा समावेश होतो.

(३) "कुटुंब" म्हणजे,

(एक) शासकीय कर्मचाऱ्याची पत्नी किंवा पती ;

(दोन) शासकीय कमचाऱ्यावर अवलंबून असतील अशी शासकीय कर्मचाऱ्याची औरस मुले, सावत्र मुले, कायदेशीर दत्तक घेतलेली मुले ;

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(तीन) शासकीय कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबून असलेले शासकीय कर्मचाऱ्याचे आईवडील ; शा. नि. न. वि. व सा. आ. वि. क्र. एमएजी-१०६५/ ८४५३४/पी. दि. ९-४-६९.

शा. नि., सा. आ.वि. क्र.एम-एजी १२७३/ ६१३७३/एम-ईडी-६ दि. २७-९-७३.

टीप :—महिला शासकीय कर्मचाऱ्याला तिच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या आणि तिच्या बरोबर राहत असलेल्या तिच्या आईवडिलाची किंवा तिच्या सासू-सासऱ्यांची निवड करता येईल.

(चार) शासकीय कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबून असलेला १८ वयाखालील अविवाहित भाऊ ;

(पाच) शासकीय कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या अविवाहित बहिणी व घटस्फोटीत बहिणी (वय लक्षात न घेता) ;

(सहा) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ खाली प्रतिपूर्ति करण्यासाठी अंशकालिक तत्वावरील नोकरी व्यतिरिक्त अन्य नोकरीस असलेली शासकीय कर्मचाऱ्याची मुले आणि अविवाहित मुली ही लाभदायक नोकरीत असल्याचे समजण्यात येईल आणि ती त्याच्यावर अवलंबून असल्याचे मानण्यात येणार नाही. शा.नि.,न.वि. व सा. आ. वि. क्र. एमएजी-१०६९-६५०२३/ पी, दिनांक २१-१२-७०.

(सात) निवृत्तिवेतन घेत असलेले शासकीय कर्मचाऱ्याचे आईवडील तसेच घटस्फोटीत बहीण हे त्यांचे कमाल उत्पन्न दरमहा रुपये २५० असेल या अटीस अधीन राहून शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबून असल्याचे समजण्यात येईल. शा.नि.,न.वि. व सा. आ. वि. क्र. एमएजी-१२७३/ ६१३७३-६, दिनांक २७-९-७५.

(आठ) यथास्थिती शासकीय कर्मचाऱ्याचा पती किंवा पत्नी वैद्यकीय भत्ता देणाऱ्या किंवा वैद्यकीय सुविधा पुरविणाऱ्या राज्य शासन, रेल्वे, संरक्षण, शासनाच्या मालकीची संघटना किंवा खाजगी संघटना यांमध्ये काम करीत असेल तर त्याला/तिला "महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१" अन्वये सवलतींचा लाभ घेण्याचा किंवा तो/ती काम करीत असलेल्या संघटनेने ठरविलेल्या सवलतींचा लाभ घेण्याचा हक्क असेल. शा.नि.,न.वि. व सा. आ. वि. क्र. एमएजी-१०७६/१०७/ पीएच-९, दि. ३०-१०-७६.

शा.नि.,न.वि. व सा. आ. वि. क्र. एमएजी-११७०/ २५७१४/पी, दिनांक २२-११-७२.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(४) "प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी (Authorised Medical Attendant)" म्हणजे-

(अ) ज्याचे वेतन दरमहा रु. ५०० पेक्षा कमी नाही अशा शासकीय कर्मचाऱ्याच्या, त्याचप्रमाणे मुंबईतील इतर कोणत्याही राजपत्रित अधिकाऱ्यांच्या बाबतीत, मुंबईतील शासकीय रुग्णालयांचा अधीक्षक किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेला इतर कोणताही अधिकारी आणि मुफसल क्षेत्रात, जिल्हा शल्यचिकित्सक किंवा यथास्थिती जिल्हा वैद्यकीय अधिकारी किंवा याबाबतीत त्यांनी प्राधिकृत केलेला इतर कोणताही अधिकारी.

(ब) ज्या अराजपत्रित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा रु. १५० पेक्षा जास्त परंतु दरमहा रु. ५०० पेक्षा कमी असेल अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, त्या ठिकाणचा किंवा जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणचा महाराष्ट्र वैद्यकीय सेवा वर्ग दोनचा अधिकारी.

(क) ज्या शासकीय कर्मचाऱ्याचे वेतन दरमहा रु. १५० किंवा कमी असेल त्यांच्या बाबतीत, महाराष्ट्र वैद्यकीय सेवा वर्ग तीन किंवा महाराष्ट्र वैद्यकीय सेवा वर्ग तीन (अ) मधील त्या ठिकाणचा किंवा त्याच्या जवळपासच्या ठिकाणचा अधिकारी.

**टीप १** :–ज्या ठिकाणी महाराष्ट्र वैद्यकीय सेवा वर्ग दोन किंवा वर्ग ३, वर्ग तीन (अ) मध्ये दोन किंवा अधिक अधिकारी असतील त्या ठिकाणी त्या अधिकाऱ्यांपैकी वरिष्ठतम अधिकारी हा, पोटनियम (४) च्या खंड (ब) आणि (क) च्या प्रयोजनासाठी प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी असेल.

**टीप २** :–ज्या ठिकाणी वरील तीन प्रवर्गांपैकी कोणत्याही प्रवर्गाचा एकच प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी असेल त्या ठिकाणी वैद्यकीय देखभाल व उपचार यांची गरज असणाऱ्या कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यासाठी तो सक्षम प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी असेल.

**टीप ३** :–कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याचा प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी हा, महाराष्ट्र राज्यामध्ये ज्या ठिकाणी तो कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्ती आजारी पडेल त्या ठिकाणच्या संदर्भात ठरवण्यात येईल–ते ठिकाण त्याला नोकरीवर पाठवल्याचे ठिकाण असो, त्याचे तात्पुरते राहण्याचे ठिकाण असो किंवा तेथे तो रजा घालवत असेल असे ठिकाण असो.

शा.नि., न.वि. व सा. आ. वि. क्र. एमएजी–१०६३/५९३७८/एस, दि. २१-६-६८

(५) "शासकीय रुग्णालय" म्हणजे, संपूर्णपणे शासनाच्या नियंत्रणाखाली असणारे शासकीय रुग्णालय/दवाखाना/प्रसूतिगृह/प्राथमिक आरोग्य केंद्र, वैद्यक व्यवसायीचे अर्थसहाय्यित केंद्र आणि राज्य मदत देत असलेले कोणतेही रुग्णालय/दवाखाना/प्रसूतिगृह आणि नगरपालिकेची आणि जिल्हा परिषदेची रुग्णालये/दवाखाने आणि त्यामध्ये, ज्या बाबतीत पूर्वोक्तपैकी कोणतीही संस्था उपलब्ध नसेल त्याबाबतीत, कोणत्याही लष्करी रुग्णालयाचा समावेश होतो.

शा.नि., न.वि. व सा. आ. वि. क्र. एमएजी–१०६२/एस, दि. १२-९-६२

शा. नि., सा. आ. वि. क्र. एमएजी–१०८१/४९०७/पीएच ९ ए, दिनांक १९-१०-८३, १९-१०-८४.

**टीप १** :–सामान्यतः शासकीय कर्मचाऱ्याने आणि त्यांच्या कुटुंबियाने शासकीय रुग्णालयातून उपचार घ्यावेत. वरील नियमान्वये मान्यताप्राप्त असलेल्या अशासकीय रुग्णालयामध्ये/दवाखान्यामध्ये, उपचार करून घेण्यापूर्वी गंभीर प्रकरणे वगळता, शासकीय कर्मचाऱ्यांनी न चुकता त्यांच्या प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचा सल्ला घ्यावा. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी–१०८१/४९०७/पीएच–९ ए, दि. १९–१०–८३, १९–१०–८४ यामध्ये नमूद केलेल्या १८ आजारांखेरीज एखाद्या गंभीर आजारांच्या बाबतीत जर त्यांना एखाद्या अशासकीय रुग्णालये/दवाखाना इत्यादीमध्ये दाखल व्हावयाचे झाल्यास तसे त्यांच्या प्राधिकृत देखभाल अधिकाऱ्यास तावडतोब कळविले पाहिजे.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



**टीप** २ :—खाली नमूद केलेल्या आजारांसाठी त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या संस्थांना मान्यता देण्यात आली आहे.

| अ.क्र. | आजाराचे नाव | प्राधिकृत संस्थेचे नाव | आदेश क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | लहान मुलांचे आजार | बाई जेरबाई वाडीया रुग्णालय, मुंबई. | एमएजी १०६५/१७९१४/ एस, दि. २४–५–१९६६ |
| २. | कर्करोग | १. टाटा मेमोरीयल रुग्णालय, मुंबई. | एमएजी १०७१/७८२०/पी, दि. २५–८–७१. |
| | | २. बालाभाई नानावटी रुग्णालय, मुंबई.<br>३. कॅन्सर रिलीफ सोसायटी, नागपूर.<br>४. अश्विनी रुरल कॅन्सर रिसर्च अॅण्ड रिलीफ सोसायटी, बार्शी.<br>५. श्री सिद्धेश्वर कॅन्सर हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सोसायटी, सोलापूर.<br>६. इंडियन कॅन्सर सोसायटीच्या महाराष्ट्रातील सर्व संस्था.<br>७. कॅन्सर इन्स्टिटयूट, अडयार मद्रास. | एमएजी १०८६/४९०७/आ.९, दिनांक १–९–८७. |
| ३. | ऑर्थोपेडीक उपचार | ऑर्थोपेडीक हॉस्पिटल महालक्ष्मी, मुंबई. | एमएजी १०७१/७८२०/पी, दि. २५–८–७१. |
| | | ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ फिजीकल मेडीसीन अॅन्ड रिहॅबिलिटेशन, महालक्ष्मी, मुंबई. | एमएजी १०८१/२९१६/आ.९, दिनांक ५ जुलै १९८५. |
| ४. | मधुमेह | रहेजा रुग्णालय, मुंबई. | एमएजी १०८१/२९१६/आ. ९, दि. ४–२–१९८६. |
| ५. | मणक्याचे विकार, खुब्याचे विकार, वेदनायुक्त सांध्याचे विकार व ते बदलण्याची शस्त्रक्रिया, दुर्बिणीद्वारे गुडघ्याच्या विकाराचे निदान व उपचार. | संचेती इन्स्टिटयूट फॉर ऑर्थोपेडीक रिहॅबिलिटेशन, पुणे. | एमएजी १०८६/१५६४/आ. ९, दि. १५ जुलै १९८६. |
| ६.(अ) | हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया (Bye-pass coronary surgery) | सदर्न रेल्वेज, हेडक्वार्टर्स हॉस्पिटल, पेराम्बूर, मद्रास.<br>ख्रिश्चन मेडिकल कॉलेज अॅंड हॉस्पिटल, वेल्लोर.<br>के. ई. एम्. रुग्णालय, मुंबई.<br>जसलोक हॉस्पिटल, मुंबई.<br>बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई.<br>कस्तुरबा हॉस्पिटल, भोपाळ,<br>श्री चित्राई तिरुनल इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस अॅन्ड टेक्नॉलॉजी, त्रिवेंद्रम. | एमएजी १०८४/४१५७/सीआर १५६/आ–९, दिनांक २९–४–८५. |

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



| अ.क्र. | आजाराचे नाव | प्राधिकृत संस्थेचे नाव | आदेश क्रमांक |
|---|---|---|---|
| (ब) | मूत्रपिंड प्रतिरोपण (Kidney Transplantation) | ख्रिश्चन मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल, बेल्लोर. | एमएजी १०८४/४१५७/सीआर १५६/आ–९. दिनांक २९–४–८५. |
| | | ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, नवी दिल्ली. | |
| | | पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयूट, चंडिगढ. | |
| | | जसलोक हॉस्पिटल, मुंबई. | |
| (क) | हृदय-शस्त्रक्रियेची प्रकरणे | सदर्न रेल्वेज, हेडक्वार्टर्स हॉस्पिटल, पेराम्बूर, मद्रास. | —,,— |
| | | ख्रिश्चन मेडिकल कॉलेज अॅन्ड हॉस्पिटल, बेल्लोर. | |
| | | के. ई. एम्. रुग्णालय, मुंबई. | |
| | | ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, नवी दिल्ली. | |
| | | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई. | |
| | | जी. बी. पंत हॉस्पिटल, दिल्ली. | |
| | | श्री चित्राई तिरुनल इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस अॅन्ड टेक्नॉलॉजी, त्रिवेंद्रम. | |
| | | पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयूट, चंडिगढ. | |
| | | एस. एस. के. एम. हॉस्पिटल, कलकत्ता. | |
| | | कस्तुरबा हॉस्पिटल, भोपाळ. | |
| | | वाडिया इन्स्टिटयूट ऑफ कार्डिआ-लॉजी, पुणे. | |
| | | रुबी हॉल क्लिनिक, पुणे. | एमएजी १०८६/२२६०/आ–९, दि. २७–४–८७. |

(६) "वैद्यकीय देखभाल" म्हणजे, प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याने शासकीय रुग्णालयात किंवा रुग्ण जर शासकीय रुग्णालयात जाण्याच्या परिस्थितीत नसेल तर रुग्णाच्या घरी किंवा त्याने आधी मान्य केले असेल तर प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याच्या रोगचिकित्सा कक्षामध्ये (कन्सल्टींग रुम) केलेली देखभाल आणि त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(अ) शासकीय रुग्णालयात किंवा शासकीय प्रयोगशाळेत उपलब्ध असतील आणि प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास आवश्यक वाटतील अशा, रोगनिदानाच्या प्रयोजना-करिता करावयाच्या परीक्षेच्या व अन्वेषणाच्या विकृति चिकित्साविषयक, अणुजीव शास्त्रा-विषयक, क्ष-किरणविषयक आणि इतर पद्धती; आणि

(ब) प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी आवश्यक असल्याचे प्रमाणित करील असा, विशेषज्ञ किंवा वैद्यकीय अधिकारी प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याशी विचार-विनिमय करून ठरवील त्या मर्यादेपर्यंत व तशा रीतीने घ्यावयाचा शासकीय विशेषज्ञाचा म्हणजे शासकीय रुग्णालयाला संलग्न अशा मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्याचा किंवा शासनाच्या सेवेत असणाऱ्या इतर कोणत्याही वैद्यकीय अधिकाऱ्याचा किंवा तसे अधिकारी नसतील तर इतर कोणत्याही विशेषज्ञाचा सल्ला.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(७) "उपचार" म्हणजे जेथे रुग्णावर उपचार करण्यात येईल अशा शासकीय रुग्णालयात उपलब्ध अशा सर्व वैद्यकीय आणि शल्यचिकित्साविषयक सुविधांचा उपयोग व त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(अ) प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याला आवश्यक वाटतील अशा, विकृति चिकित्साविषयक, अणुजीव शास्त्रविषयक, क्ष–किरण शास्त्रविषयक पद्धती किंवा अन्वेषणाच्या अन्य पद्धतींचा वापर करणे ;

(ब) राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये सर्वसाधारणपणे उपलब्ध असतील अशी विशेष किंवा सामान्य औषधे, लस, रक्तजल (Sera) किंवा त्यासंबंधीचे इतर उपचारविषयक पदार्थ पुरवणे ;

(क) शासकीय रुग्णालयांमध्ये सर्वसाधारणपणे उपलब्ध नसतील आणि रुग्णाची स्थिती सुधारण्यासाठी किंवा बिघडण्यास प्रतिबंध होण्यासाठी आवश्यक असल्याबद्दल प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी लेखी प्रमाणित करील अशी औषधे, लस, रक्तजल किंवा त्यासंबंधीचे उपचारविषयक पदार्थ पुरवणे ;

(ड) जेथे रुग्णाला दाखल केले असेल अशा रुग्णालयात सर्वसाधारणपणे पुरवण्यात येणारी सर्वसाधारण वॉर्डातील जागा पुरवणे.

**टीप** :—रुग्णालयामध्ये विशेष जागा उपलब्ध असेल आणि जर अशी विशेष जागा घेण्याची रुग्णाची इच्छा असेल व अशा जागेबद्दलच्या आकारापैकी–मग तो आहारासह असो किंवा आहाराशिवाय असो–५० टक्के आकार देण्याची हमी देईल तर त्याला विशेष जागा पुरवण्यात येईल.

(इ) त्या रुग्णालयाकडून आंतर रुग्णांना सर्वसाधारणपणे देण्यात येतात अशा शुश्रुषाविषयक सोयी.

**टीप** :—जेथे रुग्णाची योग्य ती शुश्रुषा करण्यात नोकरीवरील परिचर्या कर्मचारी अपुरे असतील अशा शासकीय रुग्णालयात किंवा जर रुग्णाला विशेष परिचर्या सुविधा आवश्यक असण्याइतपत त्याची परिस्थिती (गंभीर) असेल तर प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास त्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार, त्याला आवश्यक वाटेल अशा कालावधीसाठी एक जादा परिचारिका नेमता येईल ;

(फ) त्या रुग्णालयाकडून इतर रुग्णांना सर्वसाधारणपणे देण्यात येतो असा आहार ;

(ग) महिला रुग्णांचे बाळंतपण ;

(ह) रक्त संक्रामण (ट्रान्स्फ्युजन) सेवा ;

(आय) शासकीय दंतोपचार रुग्णालयांमध्ये कवळी इत्यादीचा खर्च वगळून उपलब्ध होणारे सर्व दंतोपचार ; शा.नि.,न.वि. व सा.आ.वि. क्र. एमएजी–१०७१/१ ६१६/पी दि.१७-२-७२.

(जे) आवश्यक असेल तेथे, रुग्णाला रुग्णालयात नेण्याकरिता रुग्णवाहिका सेवेची तरतूद करणे ;

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



शा.नि.,न.वि. व सा. आ. वि. क्र.एमएजी–१०७०/ ४१७३१/एस दि.१७-९-७३.

**टीप** :—रुग्णवाहिका सेवा आवश्यक असेल आणि ती उपलब्ध नसेल तेव्हा रुग्णाला आणि त्याच्या / तिच्या परिचराला, आवश्यक असेल तर प्रवासाच्या नित्याच्या पद्धतीने इष्ट स्थानी प्रवासी लवकरात लवकर पोचेल अशा निकटतम मार्गाने प्रवास करता येईल. शंकास्पद प्रकरणाच्या बाबतीत प्राधिकृत देखभाल अधिकारी निकटतम आणि अत्यंत स्वस्त दराचा मार्ग ठरवू शकेल. जर प्रत्येक मार्ग हा ५ किलोमीटरपेक्षा अधिक अंतराचा असेल तरच ही सवलत अनुज्ञेय आहे.

शा.नि.,न.वि., व सा. आ. वि. क्र. एमएजी–१०८३/ ६३३३८-एस दि. ७-६-७४.

(के) (एक) मधुमेह झाल्याचे कळल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीत केलेले मधुमेहाचे उपचार हे रोगाच्या प्राथमिक अवस्थेतील असल्याचे समजण्यात यावेत आणि मधुमेहाचे प्रथम निदान झाल्यानंतर, पहिल्या एका वर्षामधील उपचारासंबंधीच्या मागण्या, संबंधित प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याने, परिशिष्ट ६ मध्ये जोडलेल्या विहित नमुन्यात दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारावर संबंधित कार्यालयास स्वीकारता येतील. शासकीय कर्मचाऱ्याने, रोगाचे प्रथम निदान झाल्याची तारीख त्याच्या मागणीमध्ये दर्शविणे आवश्यक आहे.

शा. नि., सा. आ. वि. क्र. एमएजी–१०८६/१०३/ आ–९ दि.१५-५-८६.

(दोन) शासकीय कर्मचाऱ्याच्या स्वतःच्या रोगाच्या प्राथमिक अवस्थेनंतरच्या उपचारासाठी प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याने रोगाच्या प्राथमिक अवस्थेत दिलेले प्रमाणपत्र उपयोगात आणावे. दर वर्षी नवीन प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

मात्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील इतर कोणत्याही व्यक्तीला सदर आजारावरील औषधोपचारांच्या खर्चाची प्रतिपूर्ती देताना एकदा आजार प्राथमिक अवस्थेत असताना प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर पुढील औषधोपचार चालू ठेवण्यासाठी ती व्यक्ती हयात असल्यासंबंधीचे प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याचे अथवा कोणत्याही राजपत्रित अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र दरवर्षी घेण्यात यावे.

(८) "राज्य" म्हणजे महाराष्ट्र राज्य.

**३. शासकीय कर्मचाऱ्याने मोफत वैद्यकीय परिचर्येसाठी खर्च केलेल्या कोणत्याही रकमेची वैद्यकीय प्रतिपूर्ती :—**

(१) रुग्णाला विनामूल्य वैद्यकीय उपचाराचा हक्क राहील.

(२) जेव्हा पोट-नियम (१) खाली विनामूल्य वैद्यकीय उपचाराचा रुग्णाला हक्क असेल तेव्हा प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे लेखी प्रमाणपत्र प्रस्तुत केल्यानंतर, त्याने अशा उपचारादाखल खर्च केलेल्या कोणत्याही रकमेची प्रतिपूर्ती शासनाकडून शासकीय कर्मचाऱ्यास करण्यात येईल.

**टीप** :—रुग्णाच्या निवासस्थानची शुश्रूषा १० दिवसांहून अधिक काळ चालू राहाण्याची शक्यता आहे असे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे मत असेल तर प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी, रुग्णावरील उपचारासाठी जरूर त्या सोयी सर्वात जवळच्या ज्या शासकीय रुग्णालयात उपलब्ध असतील त्या शासकीय रुग्णालयात रुग्णाला पाठवील.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



**४. सर्वात जवळच्या शासकीय विशेषज्ञांनी केलेली किंवा इतर कोणत्याही वैद्यकीय अधिकाऱ्याने केलेली वैद्यकीय देखभाल आणि त्यांना अनुज्ञेय असलेला प्रवास भत्ता व फी आणि त्यासाठी शासकीय कर्मचाऱ्याचा प्रवास भत्ता :—**

(१) जर प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे असे मत असेल की, स्वतःखेरीज आणखी कोणा व्यक्तीची वैद्यकीय देखभाल आवश्यक आहे अशी रुग्णाची परिस्थिती आहे, तर तो मुंबईच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा संचालक, मुंबई यांच्या पूर्व-मान्यतेने आणि मुफसल भागामध्ये संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा शल्यचिकित्सकाच्या पूर्वमान्यतेने आणि स्वतः जिल्हा शल्यचिकित्सक हाच प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी असेल तर संबंधित विभागाच्या आरोग्य सेवा उपसंचालकाच्या पूर्वमान्यतेने ही मान्यता लेखी घेण्यात येईल—

(अ) रुग्णाला सर्वात जवळच्या शासकीय विशेषज्ञाकडे किंवा त्याच्या मते रुग्णाला ज्याची वैद्यकीय देखभाल आवश्यक असेल अशा इतर कोणत्याही वैद्यकीय अधिकाऱ्याकडे पाठवू शकेल ; किंवा

(ब) जर प्रवास झेपणार नाही इतपत रुग्ण आजारी असेल तर अशा विशेषज्ञाला किंवा इतर वैद्यकीय अधिकाऱ्याला रुग्णाची देखभाल करण्यासाठी बोलावू शकेल.

**टीप** :—जर पूर्वपरवानगी घेण्यामुळे विलंब होऊन रुग्णाच्या प्रकृतीस धोका पोहोचण्याची शक्यता असेल तर प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास, या पोटनियमाच्या (अ) आणि (ब) मध्ये दिल्याप्रमाणे उपाययोजना करता येईल व त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यास तो नंतर तात्काळ अहवाल पाठवील.

(२) पोटनियम (१) च्या खंड (अ) खाली, सर्वात जवळच्या शासकीय विशेषज्ञाकडे किंवा इतर वैद्यकीय अधिकाऱ्याकडे पाठवलेल्या रुग्णास, प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे त्याबाबतीतील लेखी प्रमाणपत्र प्रस्तुत केल्यानंतर, विशेषज्ञाच्या किंवा वैद्यकीय अधिकाऱ्याच्या मुख्यालयापर्यंत आणि तेथपासून परतीचा प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क राहील.

(३) शासकीय विशेषज्ञ किंवा पोटनियम (१), खंड (ब) अन्वये बोलावलेला कोणताही इतर वैद्यकीय अधिकारी यांना प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे त्या बाबतीतील लेखी प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, रुग्णाच्या जागेपर्यंत जाण्यायेण्याच्या प्रवासाबद्दल प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क राहील.

(४) जर शासकीय विशेषज्ञाने किंवा इतर वैद्यकीय अधिकाऱ्याने रुग्णाची तपासणी आपल्या रोगनिदान कक्षामध्ये (कन्सल्टिंग रुम) केली किंवा रुग्णाच्या निवासस्थानी केली तर त्याला, वैद्यकीय सल्ल्याकरिता प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास वाजवी वाटेल एवढी फी देण्यात येईल.

**५. रुग्ण जेथे आजारी पडतो ती जागा म्हणजे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे मुख्यालय नसेल तेव्हा रुग्णाला आणि प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याला प्रवास भत्ता देणे :–**

(१) रुग्ण जेथे आजारी पडतो ती जागा म्हणजे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे मुख्यालय नसेल त्याबाबतीत—

(अ) रुग्णाला अशा मुख्यालयास येण्याजाण्याच्या प्रवासाबद्दल प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क राहील ;

(ब) जर रुग्ण इतका आजारी असेल की त्याला प्रवास करता येणार नाही तर तो जेथे आजारी पडेल त्या ठिकाणी जाऊन प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी त्याची देखभाल करील आणि त्या ठिकाणी जाण्यायेण्यासाठी प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास राहील.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(२) (एक) पोटनियम (१) च्या खंड (अ) खालील प्रवास भत्ताविषयक अर्जाबरोबर, वैद्यकीय देखभाल आवश्यक होती अशा अर्थाचे, प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असेल ;

(दोन) पोटनियम (१) च्या खंड (ब) खालील प्रवास भत्ताविषयक अर्जाबरोबर, रुग्ण हा प्रवास करण्यास असमर्थ होता अशा अर्थाचे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असेल.

**६. रुग्णासह त्याची देखभाल करणारा अधिकारी आणि त्याला अनुज्ञेय असलेला प्रवास भत्ता :–**

नियम ४ आणि ५ खाली वैद्यकीय देखभालीसाठी रुग्णाला इतर कोणत्याही जागी प्रवास करावा लागला तर आणि वैद्यकीय देखभालीशिवाय त्याने प्रवास करणे असुरक्षित होईल असे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास वाटले तर प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी एकतर स्वत: रुग्णाबरोबर त्याच्या घरापर्यंत जाऊ शकेल किंवा इतर कोणा सोबत्यास त्याच्याबरोबर पाठवण्याची व्यवस्था करू शकेल. जर हा सोबती म्हणजे शासकीय कर्मचारी असेल तर तो कामावर असताना प्रवास करीत असल्याचे मानण्यात येईल आणि त्याला दौऱ्यावर असल्याप्रमाणे, जाण्याच्या व परतण्याच्या प्रवासाबद्दल प्रवास भत्ता घेता येईल आणि जर तो शासकीय कर्मचारी नसेल तर त्याला रुग्ण ज्या वर्गाने प्रवास करील त्या योग्य अशा वर्गाचे प्रत्यक्ष एकेरी भाडे किंवा तो स्वतः ज्या वर्गाने प्रत्यक्ष प्रवास करील अशा खालच्या वर्गाचे भाडे मिळण्याचा हक्क राहील.

**७. प्रवास भत्त्याचे दर :—**

(१) नियम ४ आणि ५ अन्वये केलेल्या प्रवासाबद्दलचा प्रवास भत्ता हा शासकीय कर्मचाऱ्यास दौऱ्यावर असताना अनुज्ञेय असणाऱ्या दरांनी देण्यात येईल.

(२) शासकीय कर्मचाऱ्याला स्वत:स ज्या वर्गाने प्रवास करण्याचा हक्क असेल त्याच वर्गाने प्रवास करण्याचा हक्क त्याच्या कुटुंबातील व्यक्तीला राहील.

(३) रुग्णाच्या देखभालीसाठी बोलावलेल्या शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही विशेषज्ञाला त्याच्या दर्जानुसार प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास वाजवी वाटेल अशा दरांनी प्रवास भत्ता मिळण्याचा हक्क राहील.

**८. शासकीय आणि अशासकीय रुग्णालयांमध्ये आंतररुग्ण म्हणून मोफत उपचार घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याने खर्च केलेल्या कोणत्याही रकमेची वैद्यकीय प्रतिपूर्ती :—**

(१) रुग्णाला विनामूल्य उपचाराचा हक्क राहील.

(२) रुग्णावर एखाद्या रुग्णालयात आंतररुग्ण ( Indoor patient ) म्हणून उपचार होणे जरुर आहे असे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास वाटेल त्याबाबतीत, जेथे आवश्यक त्या उपचाराच्या सोयी उपलब्ध असतील अशा शासकीय रुग्णालयात अशा उपचारासाठी रुग्णाला पाठवण्यात यावे. अशा रुग्णालयात विनामूल्य उपचार मिळण्याचा रुग्णाला हक्क राहील.

(३) जेथे रुग्ण आजारी पडेल त्या जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांत आवश्यक त्या सोयी उपलब्ध नसतील, किंवा जेथे रुग्ण आजारी पडेल त्या ठिकाणी शासकीय रुग्णालयात जागा नसेल, किंवा उक्त रुग्णालयाच्या कर्मचारी वर्गात जादा काम पडत असेल तर, प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा शल्यचिकित्सकांच्या पूर्वमान्यतेने आणि जिल्हा शल्यचिकित्सक हा स्वतःच प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी असेल त्याबाबतीत, संबंधित विभागाच्या (Division) आरोग्य उपसंचालकाच्या पूर्वमान्यतेने ही मान्यता लेखी घेण्यामुळे विलंब लागून रुग्णाच्या आरोग्याला धोका पोहोचत नसेल तर ती लेखीच घेण्यात येईल–जेथे जरुर तो उपचार पुरवणे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याच्या मते शक्य असेल अशा ठिकाणच्या किंवा त्या ठिकाणाजवळच्या (मग ते ठिकाण जिल्ह्याबाहेरचे असले तरी चालेल) शासकीय किंवा अशासकीय रुग्णालयात रुग्णाला पाठवील.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(४) शासकीय रुग्णालयात उपलब्ध नसणारे विशेष प्रकारचे उपचार पुरवणाऱ्या अशासकीय रुग्णालयांत एखाद्या रुग्णाला पाठवणे त्याच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे असे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास वाटेल त्याबाबतीत तो, मुंबईमध्ये महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा संचालकाच्या पूर्वमान्यतेने, आणि मुफस्सल क्षेत्रात, संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा शल्य-चिकित्सकाच्या पूर्वमान्यतेने आणि जिल्हा शल्यचिकित्सक हा स्वत:च प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी असेल त्याबाबतीत, संबंधित विभागाच्या आरोग्य सेवा उपसंचालकाच्या पूर्वमान्यतेने, ही मान्यता लेखी घेण्यामुळे विलंब लागून रुग्णाच्या आरोग्याला धोका पोहोचत नसेल तर ती लेखीच घेण्यात येईल. विशेष उपचारासाठी शासनाने मान्यता दिलेल्या सर्वात जवळच्या अशासकीय रुग्णालयात रुग्णाला पाठवील.

(५) पोटनियम (१), (२), (३) आणि (४) अन्वये जो उपचार विनामूल्य मिळण्याचा हक्क शासकीय कर्मचाऱ्याला किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तीला असेल त्या उपचारासाठी त्याने खर्च केलेल्या कोणत्याही रकमेची प्रतिपूर्ती, प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे जरुर ते प्रमाणपत्र आणि त्याच्या मागणीच्या पुष्ठ्यर्थ प्रमाणके ( Vouchers ) सादर केल्यानंतर, त्याला करण्यात येईल; परंतु प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास वाजवी वाटेल एवढ्याच रकमेची शासन प्रतिपूर्ती करील.

९. **रुग्णाच्या निवासस्थानी उपचार करणे :—**

(१) योग्य ते शासकीय रुग्णालय नाही किंवा दूर अंतरावर आहे किंवा त्याचा आजार तीव्र स्वरुपाचा आहे या कारणास्तव प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याच्या मते रुग्णावर नियम ८ च्या पोटनियम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे उपचार करता येत नसतील तर, रुग्णाच्या निवासस्थानी उपचार देता येईल.

(२) जेव्हा पोटनियम (१) अन्वये रुग्णावर त्याच्या निवासस्थानी उपचार करण्यात येईल तेव्हा त्याला नियम ८ च्या पोटनियम (२) अन्वये विनामूल्य असा जो उपचार मिळण्याचा हक्क प्राप्त झाला असता त्या उपचाराच्या खर्चाइतकी रक्कम, अशा उपचारावर त्याने केलेल्या खर्चादाखल मिळण्याचा हक्क राहील, मात्र आहारावरील खर्च यातून वगळण्यात येईल आणि प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आणि प्रमाणके (Vouchers) सादर करावी लागतील.

(३) पोटनियम (२) खाली अनुज्ञेय असणाऱ्या रकमांची मागणी करताना, पुढील गोष्टी नमूद करणारे प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे लेखी प्रमाणपत्र मागणीबरोबर पाठवण्यात येईल.

(अ) पोटनियम (१) मध्ये उल्लेख केलेले मत असण्याची कारणे ; आणि

(ब) पोटनियम (२) मध्ये उल्लेख केलेल्या उपचाराचा खर्च.

१०. **औषधे पुरवणे आणि शासकीय दवाखान्यात आणि रुग्णालयात उपलब्ध नसलेल्या औषधांच्या रकमेची प्रतिपूर्ति करणे :—**

प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याने विहित केलेली सर्व औषधे शक्यतोवर रुग्णावर जेथे उपचार करण्यात येईल त्या ठिकाणच्या शासकीय रुग्णालयातून किंवा दवाखान्यातून देण्यात येतील.

परंतु, जेव्हा एखादे औषध, लस रक्तजल (Sera) किंवा इतर उपचारविषयक पदार्थ अशा रुग्णालयात सर्वसाधारणपणे उपलब्ध नसतील तेव्हा शासकीय कर्मचारी ती प्रथम खरेदी करू शकेल आणि नंतर त्याला, प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आणि जरुर ती प्रमाणके सादर केल्यानंतर शासनाकडून त्याची प्रतिपूर्ती केली जाईल.

**टीप** :—जे पदार्थ औषधे नसून प्रामुख्याने अन्नाच्या स्वरुपाचे, शक्तिवर्धके (टॉनिके) किंवा प्रसाधनविषयक पदार्थ आहेत त्यांच्या खर्चाची प्रतिपूर्ती या नियमाखाली अनुज्ञेय नाही. हे पदार्थ अन्नविषयक पदार्थ, शक्तिवर्धके (टॉनिके) किंवा प्रसाधनविषयक पदार्थ आहेत की नाहीत हे ठरवण्यासाठी भारत सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांकरिता तयार केलेल्या यादीचा अवलंब करण्यात येईल.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



**११. वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मागण्या सादर करणे :—**

(१) या नियमांखाली अनुज्ञेय असणाऱ्या प्रतिपूर्तीच्या सर्व मागण्या, संबंधित शासकीय कर्मचाऱ्याच्या नियंत्रक प्राधिकाऱ्याकडे, वैद्यकीय देखभाल किंवा उपचार पूर्ण झाल्यापासून एक वर्षाच्या आत, सादर करण्यात येतील आणि त्या संबंधित शासकीय कर्मचाऱ्याचे भत्ते व मानधन ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात येत असेल त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात येतील.

(२) संबंधित शासकीय कर्मचाऱ्याच्या प्रवासभत्ता बिलांवर प्रतिस्वाक्षरी करण्यास सक्षम असणारे नियंत्रक प्राधिकारी प्रतिपूर्तीच्या सर्व मागण्यांवर प्रतिस्वाक्षरी करतील. अशा सर्व मागण्यांच्या पुष्ठ्यर्थ आवश्यक ती बिले, प्रमाणके, प्रमाणपत्रे इत्यादी सादर करण्यात येतील. नियंत्रक प्राधिकारी प्रतिस्वाक्षरी करण्यापूर्वी या मागण्या नियमांनुसार अनुज्ञेय आहेत याविषयी आपली खात्री करून घेतील.

**१२. वैद्यकीय देखभालीच्या संबंधात केलेला परंतु त्यात समाविष्ट न केलेला सेवांवरील खर्च :—**

(१) या नियमांनुसार विनामूल्य वैद्यकीय देखभाल व उपचार मिळण्याचा हक्क असणाऱ्या रुग्णाच्या वैद्यकीय देखभालीच्या किंवा उपचाराच्या संबंधात केलेल्या सेवांवर केलेला परंतु त्यात समाविष्ट न होणारा खर्च प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी ठरवील व तो खर्च रुग्णाकडून भरण्यात येईल.

(२) वैद्यकीय देखभाल किंवा उपचार यात एखाद्या सेवेचा समावेश होतो किंवा नाही असा कोणताही प्रश्न उपस्थित झाला तर तो महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा संचालकांकडे विचारार्थ पाठवण्यात येईल व आरोग्य सेवा संचालक आवश्यक तर तो शासनाकडे पाठवील. शासनाचा निर्णय अंतिम राहील.

**१३. मोफत वैद्यकीय देखभालीसाठी उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि ओरिसा यांच्या शासनाशी केलेली परस्पर व्यवस्था :—**

महाराष्ट्र शासनाने, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि ओरिसा यांच्या शासनांशी, त्या त्या शासनांच्या रुग्णालयांमध्ये शासकीय कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देखभाल व त्यांच्यावर उपचार विनामूल्य करण्यासंबंधी पुढील शर्तीवर आपसात व्यवस्था केली आहे :—

(१) एका शासनाचा कर्मचारी इतर राज्यांच्या प्रदेशात कामासाठी राहिला असेल किंवा प्रवास करीत असताना आजारी होईल अशाच बाबतीत विनामूल्य वैद्यकीय उपचार (विशेष औषधांचा खर्च वगळून) मर्यादित राहतील.

(२) शासकीय कर्मचारी रजा घेऊन अन्य कोणत्याही राज्यात जातील अशा बाबतीत किंवा स्वतःच्या निवडीनुसार विशिष्ट वैद्यकीय अधिकाऱ्याचा सल्ला घेण्यासाठी किंवा विशिष्ट संस्थेत उपचार करून घेण्यासाठी प्रवास करील त्याबाबतीत ही व्यवस्था लागू होणार नाही.

**१४. कुटुंबातील व्यक्तींची संख्या :—**

शा.नि., न.वि. व सा. आ. वि. क्र. एमएजी–१०७६/७९८१९, दि. ६-५-६८.

ज्यांना ३ पेक्षा कमी मुले असतील अशा कुटुंबांनी ३ जिवंत मुलांइतके आपले कुटुंब मर्यादित ठेवलेले नसेल किंवा त्यांना ३ पेक्षा जास्त जिवंत मुले असतील अशा कुटुंबांनी आपले कुटुंब सध्या आहे एवढेच मर्यादित ठेवलेले नसेल अशा कुटुंबांना, वरील नियमानुसार शासकीय कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मिळणाऱ्या विनामूल्य वैद्यकीय उपचारासंबंधीच्या सवलती मिळणार नाहीत.

टीप :—हा नियम १५ ऑगस्ट १९६८ पासून अंमलात आला आहे.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



**१५. निर्बीजीकरण शस्त्रक्रिया केल्यानंतर त्या व्यक्तीला विनामूल्य वैद्यकीय उपचार अनुज्ञेय असणे :—**

राज्यामध्ये कुटुंब नियोजन कार्यक्रम कार्यान्वित करण्यासाठी मंत्रिमंडळाच्या उप–समितीने दिलेल्या अहवालावर आधारित कुटुंब नियोजन कार्यक्रमाच्या संबंधातील शासनाच्या धोरणानुसार, १५ ऑगस्ट १९६८ रोजी ज्यांची ३ पेक्षा अधिक मुले जिवंत आहेत अशा आईवडिलांनी (स्त्री–पुरुषांनी) त्या तारखेनंतर त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या आणखी वाढविली असली तरी सुद्धा, जी १५ ऑगस्ट १९६८ पूर्वी जन्मलेली आहेत अशा मुलांना वैद्यकीय सोयी मिळण्याच्या हक्कास कोणतीही बाधा येता कामा नये. आईवडिलांना तसेच ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या जादा मुलाला विनामूल्य वैद्यकीय उपचारासंबंधीच्या सवलती मिळणार नाहीत. विनामूल्य वैद्यकीय उपचाराच्या सवलती मिळण्याचा ज्यांना हक्क होता अशा मुलांना अनुज्ञेय असलेल्या विनामूल्य वैद्यकीय उपचाराच्या सोयी मिळण्याचे चालूच राहील. परंतु जननक्षम गटात असताना जर आईवडिलांनी (शासकीय कर्मचारी किंवा त्याची पत्नी) निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया करून घेतली असेल आणि अशी शस्त्रक्रिया जेथे करण्यात आली त्या रुग्णालयाच्या किंवा दवाखान्याच्या प्रभारी असलेल्या सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याचे तशा अर्थाचे प्रमाणपत्र सादर केले असेल तर शस्त्रक्रिया केल्याच्या तारखेपासून वैद्यकीय सवलती मिळण्याचा त्यांना पुन्हा हक्क राहील. परंतु ठरवून दिलेल्या मर्यादेहून अधिक असलेल्या मुलास / मुलांना अशा सवलती मिळणार नाहीत.

शा.नि., न. वि. व सा. आ. वि. क्र. एमएजी–१०७१/४१८०१/एस दि २९-४-७४.

**१५–अ. मोफत वैद्यकीय उपचारांसाठी कर्मचाऱ्यास अपात्र ठरवण्यात आल्यानंतर, त्याने निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करून घेतल्यास, त्यानंतर त्यास मोफत वैद्यकीय उपचारांसाठी पात्र ठरवणे :—**

शासकीय कर्मचाऱ्यास मोफत वैद्यकीय उपचारांसाठी अपात्र ठरवण्यात आल्यानंतर, त्याने निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करून घेतल्यास, उक्त कालावधीत वैद्यकीय देखभालविषयक नियमांचा कोणत्याही प्रकारे भंग झालेला नसल्यास, त्या शासकीय कर्मचाऱ्यास आणि त्याच्या विवाहसाथीस (स्पाऊस) त्यास वरीलप्रमाणे अपात्र ठरविण्यात आल्याच्या तारखेपासून मोफत वैद्यकीय उपचार मिळण्याचा हक्क प्राप्त झाल्याचे समजण्यात आले पाहिजे.

शासन निर्णय, सा.आ.वि.क्र. टीबीसी-१०-८१/२७०८/ पीएच–९, दि.२४-६-८५.

**१६. निकडीच्या परिस्थितीमध्ये खाजगी रुग्णालयामध्ये केलेले आंतर उपचार, परदेशात केलेले उपचार, विशेषज्ञांनी केलेले उपचार आणि त्यांची प्रतिपूर्ती, साधनसामग्री आणि उप-यंत्रे यांवरील खर्चाची प्रतिपूर्ती :—**

(१) शासकीय कर्मचाऱ्याने १८ विशेष आजारांच्याबाबतीत **निकडीच्या परिस्थितीमध्ये** काही प्रमाणात खाजगी रुग्णालयांमध्ये घेतलेल्या आंतर उपचारांकरिता त्याने केलेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा हक्क आहे.

शासन निर्णय, क्रमांक एमएजी–१०८१/४९०७/पीएच–९ ए, दि. १९–१०–८३ च्या परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या दरांनुसार, शासकीय रुग्णालयातील शुश्रुषालयीन दराच्या ५० टक्के रक्कम वसूल करून "रुग्णालयात ठेवण्यावर" (हॉस्पिटलायझेशन) झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात आली पाहिजे.

या उपचाराच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या मागण्या परिशिष्ट चार आणि पाचमधील "क" व "ड" ह्या विहित नमुन्यामध्ये सादर करण्यात आल्या पाहिजेत.

शा. नि., सा. आ. वि. क्र. एमएजी–१०८१/ ४९०७/ पीएच–९ए, दिनांक १९–१०–८३ १९–१०–८४ आणि २–१–८५.

(२) राज्य शासकीय रुग्णालयांमध्ये ज्या रोगांसाठी अद्यापि पुरेशा सोयी नाहीत अशा दिनांक २९–४–८५ च्या शासन निर्णयात जादा दाखल केलेल्या पुढील आजारांच्या बाबतीत, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना व त्याच्या कुटुंबियांना दिनांक २९–४–१९८५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ५ मधील सूचीत दिलेल्या खाजगी रुग्णालयांमध्ये विशेषज्ञाकडील उपचाराचा फायदा घेता येईल.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(एक) उपमार्ग साधक हृदय शस्त्रक्रिया (बायपास कॉरोनरी सर्जरी)

(दोन) मूत्रपिंड रोपण

(तीन) रक्ताचा कर्करोग

(चार) हृदयावरील शस्त्रक्रिया

अशा प्रकरणामध्ये प्रवासावरील खर्च वगळता, ज्या रुग्णालयामध्ये उपचार घेण्यात आले अशा संबंधित रुग्णालयाने आकारलेल्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती करून देण्यात आली पाहिजे.

(३) ज्या आजारांसाठी भारतातील उपचारासाठी ज्या सोयी व्यापक प्रमाणात सुस्थापित झालेल्या नाहीत आणि आजारासाठी जे विदेशी उपचार उपलब्ध असल्याचे समजण्यात येते अशा सोयीसाठी, संचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखालील समितीने निश्चित केलेल्या आजारांच्या बाबतीत वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस परवानगी देण्यात आलेली आहे. ही प्रतिपूर्तीची रक्कम असे उपचार भारतात मुंबई येथील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये घेण्यात आले असते तर जो खर्च आला असता त्या खर्चाएवढी मर्यादित असावी.

शा. नि., क्र. एमएजी–१०८४/४१५७/सीआर–१५६/पीएच-९ ए, दिनांक २९–४–८५.

अशा प्रकरणांमधील विमान प्रवासाच्या भाड्याच्या खर्चाची प्रतिपूर्तीसंबंधीचा विचार करण्यात येणार नाही. अशी अपवादात्मक प्रकरणे शासन निर्णय क्रमांक एमएजी–१०८४/४१५७/सीआर–१५६/पीएच–९ ए, दिनांक २९–४–८५ च्या परिच्छेद १ (३) मध्ये नमूद केलेली आहेत.

शा.नि., न.वि. व सा. आ. वि. क्र. एमएजी–१०८२/४१९/सीआर–६३/पीएच–९-अ, दिनांक ३१-१२-८४.

(४) शासकीय कर्मचाऱ्याने घेतलेल्या उपचारासाठी ज्यांची अत्यंत आवश्यकता आहे अशी किंमती उपयंत्रे व साधनसामग्री खरेदी करण्यावर झालेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीस परवानगी देण्यात आली आहे.

(५) टाटा रुग्णालयामध्ये कर्क रोगावर केलेल्या उपचारांसाठी झालेल्या संपूर्ण वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती चालू ठेवण्यात आली पाहिजे. तथापि स्पेशल नर्सिंग होममध्ये दाखल केल्यास झालेला खर्च पोट-नियम (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनियमित करण्यात येईल.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



**१७. वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या पूर्वीच्या पद्धतीचे सुलभीकरण :—**

शासकीय कर्मचाऱ्याला वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यात होणारा विलंब टाळण्यासाठी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची पूर्वीची कार्यपद्धती सुलभ करण्यात येत आहे. प्रमाणकांवर प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याने प्रतिस्वाक्षरी करण्याची आवश्यकता नाही.

प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकारी नमुना (यथास्थिती) "अ" किंवा "ब" मध्ये एक प्रमाणपत्र देईल आणि त्या प्रमाणपत्राच्या आधारे, शासकीय कर्मचारी बाजारातून औषधे व उपयंत्रे खरेदी करू शकेल आणि त्याची खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी, परिशिष्ट "दोन" आणि "तीन" मध्ये दिलेल्या नमुना "अ" किंवा "ब" मध्ये प्रमाणकासह सादर करू शकेल.

शा. नि., सा. आ. वि. क्र. एमएजी–१०८४/११६/ पीएच–९ ए, दिनांक २१-७-८४ व २४–८–८४.

**१८. हृदय शस्त्रक्रिया, मूत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया, रक्ताचा कर्करोग आणि उपमार्ग साधक हृदय शस्त्रक्रिया (बायपास कॉरोनरी सर्जरी) यांसाठी आगाऊ रक्कम देणे :—**

शासकीय कर्मचाऱ्यांना, हृदय शस्त्रक्रिया, मूत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया, रक्ताचा कर्करोग आणि उपमार्ग साधक हृदय शस्त्रक्रिया (बायपास कॉरोनरी सर्जरी) यांच्या बाबतीत उपयंत्रे आणि किंमती औषधे खरेदी करता येण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांना सहाय्य देण्यासाठी रुपये ४५,००० एवढी आगाऊ रक्कम, किंवा उपयंत्रे आणि किंमती औषधे यांवरील प्रत्यक्ष खर्च, यापैकी जो कमी असेल तेवढ्या खर्चाची रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

शा. नि., सा. आ. वि. क्र. एमएजी–१०८३/४११९/ पीएच–९ ए, दिनांक २१–८–८५.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**डी. टी. जोसेफ,**
शासनाचे सचिव.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



## परिशिष्ट एक

**केंद्र/राज्य शासकीय कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय यांची वैद्यकीय देखभाल आणि/किंवा उपचार यांच्या संबंधात करण्यात आलेल्या वैद्यकीय खर्चाच्या परताव्याची मागणी करण्याकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना**

**टीप** :—प्रत्येक रुग्णाकरिता स्वतंत्र नमुना वापरावा.

---

१. शासकीय कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम (ठळक अक्षरात) :

२. कर्मचारी ज्या कार्यालयात नोकरीत आहे त्या कार्यालयाचे नाव. :

३. वित्तीय नियमांमध्ये व्याख्या केल्याप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्याचे वेतन आणि इतर वित्तलब्धी स्वतंत्रपणे दर्शविण्यात याव्यात. :

४. कामाचे ठिकाण :

५. प्रत्यक्ष निवासस्थानाचा पत्ता :

६. रुग्णाचे नाव आणि शासकीय कर्मचाऱ्याशी त्याचे/तिचे नाते. :

**टीप** :—मुलांच्या बाबतीत वयसुद्धा नमूद करावे.

७. ज्या ठिकाणी रुग्ण आजारी झाला असेल ते ठिकाण :

८. आजाराचे स्वरूप व कालावधी :

९. मागणी केलेल्या रकमेचा तपशील :—

**वैद्यकीय देखभाल**

(एक) रोग लक्षणासाठी सल्ला देण्याची फी द्यावी—

(अ) ज्या वैद्यकीय अधिकाऱ्याचा सल्ला घेतला असेल त्याचे नाव व पदनाम आणि ज्या रुग्णालयाशी किंवा दवाखान्याशी तो संबंधित असेल त्या रुग्णालयाचे किंवा दवाखान्याचे नाव. :

(ब) किती वेळा सल्ला घेण्यात आला ती संख्या आणि त्याच्या तारखा आणि प्रत्येक सल्ल्यासाठी दिलेली फी. :

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(क) रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या : रोगचिकित्सा कक्षात (कन्सल्टिंग रुम) सल्ला घेण्यात आला की रुग्णाच्या निवासस्थानी सल्ला घेण्यात आला, ते नमूद करावे.

(दोन) रोग निदान करताना करण्यात आलेल्या विकृति चिकित्साविषयक, अणुजीवशास्त्रीय, क्ष–किरणशास्त्रीय किंवा इतर तत्सम चाचण्यांसाठी आकारण्यात आलेली फी. त्यामध्ये पुढील गोष्टी नमूद कराव्यात—

(अ) ज्या रुग्णालयात किंवा प्रयोगशाळेत : चाचण्या घेण्यात आल्या होत्या त्या रुग्णालयाचे किंवा प्रयोगशाळेचे नाव.

(ब) प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधि- : काऱ्याच्या सल्ल्याने चाचणी घेण्यात आली होती किंवा कसे. घेण्यात आली असेल तर तशा अर्थाचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

(तीन) बाजारातून खरेदी केलेल्या औषधांचा खर्च : (औषधांची सूची व रोखीच्या पावत्या जोडण्यात याव्यात).

**विशेषज्ञांचा सल्ला घेणे**

विशेषज्ञाला किंवा प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्याव्यतिरिक्त किंवा प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याव्यतिरिक्त एखाद्या अन्य वैद्यकीय अधिकाऱ्याला देण्यात आलेली फी. त्यामध्ये पुढील गोष्टी दर्शविण्यात याव्यात :—

(अ) ज्याचा सल्ला घेण्यात आला असेल त्या : विशेषज्ञाचे किंवा वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव व पदनाम व तो ज्या रुग्णालयाशी संलग्न असेल त्या रुग्णालयाचे नाव.

(ब) किती वेळा सल्ला घेण्यात आला ती संख्या : व जेव्हा सल्ला घेण्यात आला ती तारीख व प्रत्येक सल्ल्यासाठी आकारण्यात आलेली फी.

(क) सल्ला रुग्णालयात किंवा विशेषज्ञाच्या किंवा : वैद्यकीय अधिकाऱ्याच्या रोगचिकित्सा कक्षात (कन्सल्टिंग रुम) किंवा रुग्णाच्या निवासस्थानी घेण्यात आला होता किंवा कसे.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(ड) त्या प्रांताच्या मुख्य प्रशासकीय वैद्यकीय : अधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेने व सल्ल्याने विशेषज्ञाचा किंवा वैद्यकीय अधिकाऱ्याचा सल्ला घेण्यात आला होता किंवा कसे. तसा सल्ला घेण्यात आला असेल तर तशा अर्थाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

१०. मागणी केलेली एकूण रक्कम :

११. सहपत्रांची यादी :

१२. कुटुंबातील व्यक्तींची संख्या म्हणजेच १५ ऑगस्ट : १९६८ रोजी आणि त्यानंतर जिवंत असलेली मुले.

---

**शासकीय कर्मचाऱ्याने सही करून द्यावयाचे प्रतिज्ञापन**

मी याद्वारे जाहीर करतो की, या अर्जामध्ये केलेली निवेदने माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी असून ज्या व्यक्तींवर वैद्यकीय खर्च करण्यात आला ती व्यक्ती पूर्णपणे माझ्यावर अवलंबून आहे.

शासकीय कर्मचाऱ्याची सही.
(कर्मचारी) ज्या कार्यालयाशी संबंधित
आहे त्या कार्यालयाचे नाव.

## परिशिष्ट दोन

क्रमांक शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी/१०८४/११६/पीएच–९ ए, दिनांक २१–७–८४.

### परिशिष्ट "अ"

.................................. येथे नोकरीत असलेल्या व श्री./श्रीमती ..................... यांची पत्नी/यांचा पती/यांचा मुलगा/यांची मुलगी/यांची आई/यांचे वडील/यांची बहिण असलेल्या श्री./श्रीमती/कुमार/कुमारी ............................ यांना पुढीलप्रमाणे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

### प्रमाणपत्र "अ"

( उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात न आलेल्या रुग्णाच्या बाबतीत द्यावयाचे. )

मी, डॉ. .................................. याद्वारे असे प्रमाणित करतो की,

(अ) या रुग्णावर .................................. रुग्णालयात/माझ्या रोगचिकित्सा कक्षात (कन्सल्टिंग रुम) उपचार करण्यात आले होते आणि रुग्णास बरे वाटण्याकरितां/त्याची स्थिती अधिक खालावू नये याकरिता याबाबतीत मी लिहून दिलेली, खाली उल्लेखिलेली औषधे अत्यावश्यक होती. विहित केलेली औषधे ही, शासन निर्णय क्रमांक एमएजी–१०६८/६०११(ए)–पी, दिनांक ११ फेब्रुवारी १९७१, एमएजी–१०६८/६०५११/(ए)–पी, दिनांक २९ एप्रिल १९७२ आणि शा. नि. क्र. एमएजी–१०७२/एस, दिनांक २४ सप्टेंबर १९७३, या अन्वये, (वैद्यकीय खर्चाची) प्रतिपूर्ती मिळण्याजोग्या औषधांच्या प्रवर्गात समाविष्ट करण्यात आली असून, ती रुग्णांना पुरवठा करण्याकरिता ............................ (रुग्णालयाचे नाव) या रुग्णालयाच्या साठ्यात नाहीत व त्यामध्ये ज्यांच्याकरिता समान उपचारशास्त्रीय मूल्य असणारे (रोगनिवारण करण्याची तितकीच क्षमता असणारे) अधिक स्वस्त पदार्थ उपलब्ध आहेत अशा दुकानातच तयार करून मिळणाऱ्या औषधांचा तसेच मूलतः अन्नपदार्थ, शक्तीवर्धके (टॉनिक्स) किंवा जंतुनाशके यांचा समावेश होत नाही.

| अनुक्रमांक | औषधाचे/उपयंत्राचे नाव व त्यांचा प्रवर्ग दिनांक | दररोजचे प्रमाण | एकूण आवश्यक असलेले प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | .................. | .................. | .................. |
| २ | .................. | .................. | .................. |
| ३ | .................. | .................. | .................. |
| ४ | .................. | .................. | .................. |
| ५ | .................. | .................. | .................. |

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(ब) रुग्णास ················ हा आजार असून/होता व ·············· पासून ················· पर्यंत मी त्याच्यावर/तिच्यावर उपचार करीत आहे/होतो.

(क) रुग्णावर प्रसूतिपूर्व/प्रसूत्युत्तर उपचार करण्यात आले नाहीत / आले नव्हते.

(ड) क्ष–किरण चाचण्या, प्रयोगशाळा चाचण्या इत्यादीकरिता रुपये ············ इतका खर्च करण्यात आला व तो करणे आवश्यक होते व माझ्या सल्ल्यावरून ················· (रुग्णालयाचे किंवा प्रयोगशाळेचे नाव) येथे या चाचण्या करण्यात आल्या.

(इ) रुग्णास रुग्णालयात दाखल करणे आवश्यक नाही / नव्हते.

ठिकाण ····················

दिनांक ····················

वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव, सही व पदनाम,
(अधिकारी) ज्या रुग्णालयाशी / दवाखाना
इत्यादीशी संबंधित असलेल्या रुग्णालयाचे /
दवाखान्याचे नाव व शिक्का.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



## परिशिष्ट तीन

### जोडपत्र "ब"

..................... येथे नोकरीस असलेल्या व श्री./श्रीमती ................ यांची पत्नी/यांचा पती/यांचा मुलगा/यांची मुलगी/यांचे वडील/यांची आई असलेल्या श्री./श्रीमती/कुमार/कुमारी ............................................... यांना पुढील-प्रमाणे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

### प्रमाणपत्र "ब"

( उपचाराकरिता रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या रुग्णांच्या बाबतीत द्यावयाचे. )
( रुग्णालयातील त्या प्रकरणाच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याने यावर स्वाक्षरी करावी. )

मी, डॉक्टर ..............................., याद्वारे असे प्रमाणित करतो की :—

(अ) ह्या रुग्णास माझ्या/डॉ. ................................... ( वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव व पदनाम ) यांच्या सल्ल्यावरून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

(ब) हा रुग्ण .............................. येथे उपचार घेत असून रुग्णास बरे वाटण्याकरिता/त्याची स्थिती अधिक खालावू नये याकरिता याबाबतीत मी लिहून दिलेली, खाली उल्लेखिलेली औषधे अत्यावश्यक होती. विहित केलेली औषधे ही या प्रमाणपत्रासोबत जोडलेल्या जोडपत्र–एक/जोडपत्र–दोन/जोडपत्र–तीनच्या शा. नि. क्र. एमएएस–१०६८/६०५११/(ए)/पी, दिनांक ११ फेब्रुवारी, १९७१, क्र. एमएजी–१०७२–६००७२/एस, दि. २९ एप्रिल, १९७२ व शा. नि. क्र. एमएजी–१०७२–६००७२–एस, दि. २४ सप्टेंबर १९७३ मध्ये औषधांच्या प्रवर्गात समाविष्ट करण्यात आली असून रुग्णांना पुरवठा करण्याकरिता ..................

(रुग्णालयाचे नाव) या रुग्णालयातील साठ्यात ही औषधे उपलब्ध नाहीत व यामध्ये, ज्यांच्या-करता समान उपचारशास्त्रीय मूल्य असणारे (रोगनिवारण करण्याची तितकीच क्षमता असणारे) अधिक स्वस्त पदार्थ उपलब्ध आहेत, अशा दुकानातच तयार करून मिळणाऱ्या औषधांचा तसेच मूलतः अन्नपदार्थ, शक्तिवर्धके किंवा जंतुनाशके यांचा समावेश होत नाही.

| अनुक्रमांक | औषधांचे/उपयंत्राचे नाव व त्याचा प्रवर्ग क्रमांक | दररोजचे प्रमाण | एकूण आवश्यक असलेले प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ........ | ........ | ........ |
| २ | ........ | ........ | ........ |
| ३ | ........ | ........ | ........ |
| ४ | ........ | ........ | ........ |
| ५ | ........ | ........ | ........ |

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(क) रुग्णास ................................ हा आजार असून/होता व ............... पासून ............. पर्यंत मी त्याच्यावर/तिच्यावर उपचार करीत आहे/होतो.

(ड) क्ष–किरण चाचण्या, प्रयोगशाळा चाचण्या इत्यादीकरिता रु. ................ इतका खर्च करण्यात आला व तो करणे आवश्यक होते व माझ्या सल्ल्यावरून .............. (रुग्णालय किंवा प्रयोगशाळेचे नाव) येथे या चाचण्या करण्यात आल्या.

ठिकाण.......................

दिनांक.......................

रुग्णालयातील या प्रकरणातील प्रभारी
अधिकाऱ्याचे नाव, स्वाक्षरी व पदनाम
आणि रुग्णालयाचे नाव व शिक्का.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



## परिशिष्ट चार

### नमुना "क"

### तातडीच्या वैद्यकीय उपचारांकरिता शासकीय कर्मचाऱ्याला द्यावयाचे खर्चाचे प्रमाणपत्र

( उपचार करणाऱ्या खाजगी व्यवसायीने द्यावयाचे. )

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की—

........................ येथे ........................ या पदावर नोकरीस असलेल्या व ........................................ या पत्त्यावर राहणाऱ्या श्री./श्रीमती ........................................ यांची/यांचा, पत्नी/पती/ मुलगा/मुलगी/वडील/आई/भाऊ/बहीण श्री./श्रीमती ........................ याच्यावर/हिच्यावर दिनांक ........................ पासून ................ पर्यंत तातडीने उपचार करण्याची गरज असलेला रुग्ण म्हणून ........................ यांनी पुढील उपचार केले होते :—

पुढील तक्रारींकरिता ........................
........................
........................

दिसून आलेले प्रमुख लक्षण ........................
........................
........................

आवश्यक ती तातडीची तपासणी व तिचे निष्कर्ष ........................
........................
........................

रोगनिदान ........................

उपचारांकरिता झालेला एकूण खर्च (जोडपत्र "ड") रुपये ................ इतका होता, व त्याचा तपशील नमुना "ड" मध्ये देण्यात आला आहे. याद्वारे, असे प्रमाणित करण्यात येते की, तातडीच्या उपचारानंतर रुग्णाला पुढील उपचाराकरिता प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिकाऱ्यास भेटण्याचा सल्ला देण्यात आला होता.

दिनांक ................ स्वाक्षरी ........................

डॉक्टराचे नाव ....................

ठिकाण ................ नोंदणी क्रमांक ....................

रुग्णालयाचे नाव ....................

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



## परिशिष्ट पाच

### नमुना "ड"

**खाजगी रुग्णालयात तातडीचे उपचार करण्यात आलेल्या शासकीय कर्मचाऱ्याकरिता करण्यात आलेल्या खर्चाचे (तपशीलवार) प्रमाणपत्र**

( उपचार करणाऱ्या डॉक्टरने भरावयाचे व जोडपत्र "क" ला जोडावयाचे )

रुग्णाचे नाव :

रुग्णालयात दाखल केल्याची तारीख :

रुग्णालयातून घरी पाठवल्याची तारीख :

रुग्णालयाचा नोंदणी क्रमांक :

अ) १) सल्ला :

२) दररोज रु. ................. या दराने : दिनांक .......... पासून ............ पर्यंत एकूण ................ दिवसांचा रुग्णालयात ठेवल्याचा खर्च.

३) शस्त्रक्रियेवरील खर्च :

४) शस्त्रक्रियागारात केलेला खर्च :

५) बधिरीकरणावरील खर्च :

६) दिलेल्या भेटी (व्हिजिटस्) :

अ) प्रत्येक भेटीसाठी (व्हिजिट) रु. ........ : याप्रमाणे नेहमीच्या भेटीची संख्या

ब) प्रत्येक भेटीसाठी (व्हिजिट) रु. ......... : प्रमाणे विशेष भेटीसाठी रुग्णाला ........ या डॉक्टरांकडे जितक्या वेळा पाठवले ती संख्या.

डॉक्टर .............. यांच्याकडे : दर भेटीसाठी (व्हिजिटला) रु. ......... या दराने जितक्या वेळा पाठवले ती संख्या.

डॉक्टर ............... यांच्याकडे : दर भेटीसाठी (व्हिजिटला) रु. ......... या दराने, जितक्या वेळा पाठवले ती संख्या.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



७) दररोज रुपये ········ या दराने ········ :
दिवस इन्क्युबेटरचा वापर केला.

८) प्रतिदिनी रुपये ········ या दराने ········ :
दिवस मॉनिटरचा वापर केला.

९) तपासण्या : अ) विकृतिचिकित्सा (पॅथॉलॉजी) : प्रयोगशाळा.

ब) क्ष–किरण छायाचित्रे :

क) प्रत्येक छत्स्पंद विद्युतलेखा- : साठी (ईसीजी) रुपये ······· प्रमाणे छत्स्पंद विद्युतलेखाचा खर्च.

ड) इतर :

ब) औषधे :

| अनुक्रमांक | औषधाचे नाव | औषधाची किंमत (रुपये पैसे) |
|---|---|---|
| | ································ | |
| | ································ | |
| | एकूण .. | |
| | एकूण बेरीज (अ + ब) .. | |

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



## परिशिष्ट सहा

**(केवळ मधुमेह झालेल्या रुग्णांवर उपचार केले असताना द्यावयाचे प्रमाणपत्र)**

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की,

श्री./श्रीमती/कुमारी ..................................................

[श्री./श्रीमती/कुमारी .............................................. यांचे/यांची

पती/पत्नी/मुलगा/मुलगी/आई/वडील/भाऊ/बहीण]

........................................................ विभागाचे कर्मचारी हे

माझ्या वैद्यकीय सल्ला कक्षात / रुग्णालयात मधुमेहाच्या रोगावर उपचार घेत असून दिनांक ...............

पासून ........................................ पर्यंतच्या कालावधीत त्यांच्या रोगाची

प्रारंभिक अवस्था असताना त्यावर उपचार करण्यासाठी / रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यासाठी

त्यांना "इन्सुलीन", "नादीसन" वगैरे औषधे देण्यात आली होती. उपरोक्त रुग्णाची प्रकृती गंभीर झाल्यामुळे त्यास रुग्णालयात ठेवणे भाग पडले.

त्यांच्या आजाराचे दिनांक .................. रोजी निदान झाले.

अधिकृत वैद्यकीय परिचर्या अधिकारी

[ नाव व पदनाम ]

ठिकाण :

दिनांक :

रुग्णालय/वैद्यकीय सल्ला कक्ष/यातील
प्रभारी वैद्यकीय अधिकारी

---

टीप :—प्रत्यक्ष शासकीय कर्मचाऱ्यावरील उपचारांच्या बाबतीत प्रमाणपत्र द्यावयाचे असेल तर कंसातील मजकूर वगळण्यात यावा.

शामुको.—एच २–२,५२९ पु.–६.८८

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY